# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन केलेल्या पाण्याचा पुर्न:वापर करणे बाबत आर.एफ.पी. (R.F.P.) मागविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्र २६.४० चौ.कि.मी. असून सन २०११ च्या जनगणनेनुसार भिवंडी शहराची लोकसंख्या ७,०९,६६५ इतकी असून तरंगत्या लोकसंख्येसह शहराची अंदाजे लोकसंख्या १२ लक्ष इतकी आहे. भिवंडी शहर हे वस्त्रोद्योगासाठी प्रसिध्द असून भिवंडी शहर हे वस्त्रोद्यगाचे मँचेस्टर म्हणून ओळखले जाते.

मल:ध्दीकरण केंद्रामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून निर्माण (पुर्नचक्रित) झालेले पाणी ठोक स्वरुपात खाजगी संस्था, औद्योगिक कारखाने, खाजगी टँकरधारक यांना ठोक स्वरुपात पाणी विक्री करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव बनविणे कामी तत्कालीन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिनांक ०५/०६/२०२३ रोजी झालेल्या आढावा बैठकीत निर्देश दिलेले आहेत.

सद्यस्थितीत भिवंडी शहराला एकूण ११५ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा होत असून शहरात एकूण ९० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतके सांडपाणी निर्माण होत आहे. सदर सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी भुयारी गटार योजना टप्पा-१ अंतर्गत १३ दशलक्ष लिटर क्षमतेचे मल:शुद्धीकरण केंद्र २०१५ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेले आहे. सदर मल:शुद्धीकरण केंद्रामध्ये एकुण प्रतिदिन ८ दशलक्ष लिटर इतक्या पाण्यावर प्रक्रिया केली जाते. तसेच भिवंडी शहरांमध्ये सद्यस्थितीत सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ चे काम प्रगतीपथावर असून योजनेमध्ये अंर्तभुत चार मल:शुध्दीकरण केंद्रे प्रस्तावित असून त्याची एकूण क्षमता ९९ दशलक्ष लिटर इतकी आहे. त्यामधील इदगाह येथील ३० दशलक्ष लिटर क्षमतेचे मल:शुध्दीकरण केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले असून मल:शुध्दीकरण केंद्रामधून ८ दशलक्ष लिटर इतक्या पाण्यावर प्रक्रिया केली जात असून कार्यान्वित दोन्ही मल:ध्दीकरण केंद्रामध्ये एकूण १६ दशलक्ष लिटर इतके प्रक्रिया केलेले सांडपाणी निर्माण होत आहे.

शहरामध्ये कार्यान्वित असलेले २ मल:शुध्दीकरण केंद्र हे SEQUENCING BATCH REACTOR (एस.बी.आर.) टेक्नॉलॉजी प्रकारचे असून त्यामध्ये सांडपाण्यावर सेकंडरी प्रकारची प्रक्रिया केली जाते. परंतू सद्यस्थितीत त्या पाण्यावर तृतीयक (TERTIARY TREATMENT) प्रक्रिया केली जात नाही. मल:शुध्दीकरण केंद्रामधून निर्माण होणारे प्रक्रिया केलेले सांडपाणी काही प्रमाणात शहरातील उद्यानांसाठी वापरले जाते. उर्वरित पाणी शहरातील वस्त्रोद्योग व इतर वापराकरीता वापरण्याचे नियोजन आहे.

शहरांमधील वस्त्रोद्योगधारक व इतर औद्योगिक संस्था यांची मलशुध्दीकरण केंद्रामधून प्रक्रिया केलेले पाणी पुर्न:वापराबाबत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार उद्योगधारकांनी त्यांच्या स्वखर्चाने प्रक्रिया केलेले पाणी उचलून त्यांच्या वापराकरीता वापरणार असल्याची सहमती दर्शविलेली आहे. तसेच सेकंडरी ट्रीटमेंट केलेले पाणी त्यांच्या उद्योगाकरीता उपयोगात येऊ शकत असलेबाबत देखील कळविलेले आहे.

सद्यस्थितीत एकुण सांडपाण्यावर प्रक्रिया करून निर्माण होणारे पाणी १६ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतके असून सदर पाणी पुर्न:वापर करणे करिता E.O.I. (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) मागवून शहरातील वस्त्रोद्योगधारक व इतर औद्योगिक संस्था यांना विकण्याचा भिवंडी महानगरपालिकेचा मानस आहे. सदर पाणी पुर्न:वापर करणे कामी आवश्यक जलवाहिन्या अंथरणे, पंपींग मशनरी बसविणे व इतर अनुषंगीक बाबींकरीता लागणारा खर्च स्वता: करून पाण्याचा पुर्न:वापर करणेबाबत वस्त्रोद्योगधारक व इतर औद्योगिक संस्था यांनी सहमती दर्शविलेली आहे.

तरी शहरातील मल:शुध्दीकरण केंद्रांमध्ये प्रक्रिया केलेले निर्माण होणा-या पाण्याच्या पुर्न:वापराबाबत धोरण निश्चिती करण्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत प्रक्रिया केलेले पाणी खाडीमध्ये सोडले जात आहे. सदर पाण्याची ठोक स्वरुपात विक्री केल्यास महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात वाढ होऊ शकेल या करीता खाजगी संस्था, औद्योगिक कारखाने, तसेच खाजगी टँकरधारक यांचेकडून त्याचा मल:शुध्दीकरण केंद्रापासून पाणी वाहून नेणे करीता प्रति १००० लिटर रु. १०/- प्रमाणे दर मागविणे योग्य होईल व त्याकामी पाईप लाईन अंथरणे, मीटर बसविणे व रस्ते खोदाई शुल्क इत्यादीचा खर्च स्वखर्चाने करावा व त्या कामी मनपाची परवानगी घेणे बंधनकारक राहिल.

तरी मनपाचे काटई गाव व इदगाह येथील मल:शुध्दीकरण केंद्रामधील प्रक्रिया केलेले पाणी ठोक स्वरुपात खाजगी संस्था, औद्योगिक कारखाने, तसेच खाजगी टँकरधारक द्वारे विक्री करणे कामी आर.एफ.पी.(R.F.P.) मागविणे कामी आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन केलेल्या पाण्याचा पुर्न:वापर करणे बाबत आर.एफ.पी. (R.F.P.) मागविणे बाबत.** | **प्रति १००० लिटर रु.१०/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन केलेल्या पाण्याचा पुर्न:वापर करणे बाबत आर.एफ.पी. (R.F.P.) मागविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४६० **दिनांक :** २४/०६/ **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन केलेल्या पाण्याचा पुर्न:वापर करणे बाबत आर.एफ.पी. (R.F.P.) मागविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन केलेल्या पाण्याचा पुर्न:वापर करणे बाबत आर.एफ.पी. (R.F.P.) मागविणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**